# दिनांक 21/04/2025

**1.** रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/04/2025 रोजी 19:30 वा च्या सुमारास मौजे बायपास रोड रोहा येथे कॉन्ट्रक्टच्या कामाच्या ठीकाणी ता. रोहा येथे फिर्यादी हे आरोपीत नं.2 रा- रोठ ता- रोहा यांचेकडे कॉन्ट्रॅक्ट मध्ये स्टिल फिटींगचे काम करित होते. त्यानंतर ते सदर ठिकाणी दुसऱ्या कॉन्ट्रॅक्ट मध्ये काम करित होते त्यावेळी आरोपी नं. 02 यांचे कामाचे 1500 रू बाकी होते त्या पैशांकरिता फिर्यादी याने आरोपी नं.02 याला बरेच वेळा फोन करून फोन उचलला नाही म्हणुन फिर्यादी याने दुसऱ्या फोन वरून मजुरीचे पैसे मांगीतले तेव्हा आरोपी नं 02 याने फिर्यादी यांना शिवीगाळी व दमदाटी करून मे सुबह साईड पे आके तेरा पैसा देता हु असे बोलुन फोन कट केला व दि. 19/04/2025 रोजी सकाळी 09.00 वा च्या सुमारास आरोपीत नं 02 याने आपले कामाचे साइड वर जावुन पैसे दिले परंतु तेथुन जाताना त्यांचे कडे कामास असलेला त्यांचा कामगार आरोपीत नं 02 हा आपल्याकडे फिरकला तर त्याला मारा ईथे उभा करू नका अशी चिथावणी देवुन तेथुन निघुन गेला त्यानंतर आरोपीत क्र01 याने फिर्यादी याचेकडे जावुन शिवीगाळी करून त्याचे हातातील लोखंडी सळइने फिर्यादी यांचे तोंडावर डावे बाजुस मारून डावे भुवईजवळ दुखापत केली.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं. 79/2025, भारतीय न्याय संहिता कलम 118(2), 49, 352, 351(2), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/भास्कर शिद हे करीत आहेत.

**2.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/04/2025 रोजी 23:30 वा च्या सुमारास मौजे विघवली गावचे हददीत मुंबई गोवा हायवे रोडवर विघवली फाटयाजवळ ता. माणगांव येथे फिर्यादी रा. वारक आदीवासीवाडी ता. माणगांव याचा जखमी मुलगा शुषमीर कोळी हा त्याचे मित्र यास होंडा शाईन मोटार सायकल क्रमांक एम.एच 06 बी.एस 0481 वर पाठी बसवुन स्वत: मोटार सायकल इंदापुर बाजुकडुन विघवली बाजुकडे चालवित जात असताना विघवली फाटया जवळ विघवली गावकडे उजव्या बाजुस वळत असताना माणगांव बाजुकडुन मुंबई बाजुकडे जाणारा ट्रक आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा अतीवेगाणे,अविचाराणे,रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन वाहन बेदरकारपणे चालवुन मोटार सायकलीस पाठीमागुन ठोकर मारुन अपघात केला सदर अपघातात जखमी यांच्या पायास व डोक्यास लहान मोठया गंभीर स्वरुपाच्या दुखापतीस व मोटार सायकलीचे नुकसानीस कारणीभुत होवुन जखमीना दवाखाण्यात न नेता पोलीसांना सदर अपघाताची खबर न देता पळुन गेला.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं. 83/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184,134, भारतीय न्याय संहिता कलम 125 (a), 125( b),281, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/सुरज फडताडे हे करीत आहेत.

**3.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/04/2025 रोजी 09:00 वा च्या सुमारास मौजे पेण शहरातील जुन्या पेण पोलीस हायवे चौकीचे पाठीमागे रेल्वे कॉलनीच्या रस्त्यालगत पेण येथे कोणीतरी अज्ञात इसमाने काळया पांढ-या रंगाची स्कुटर एकूण 40,000/-रुपये व किंमतीची स्कुटी हि फिर्यादी यांच्या रा. रामवाडी समर्थ नगर अंबामाता मंदिर जवळ ता. पेण संमतीशिवाय स्वत:च्या फायदयाकरीता चोरुन नेली.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं. 73/2025, भा. न्या. सं. 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/अमोल म्हात्रे हे करीत आहेत.

**4.** गोरेगांव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/04/2025 रोजी 11:30 वा च्या सुमारास मौजे लोणेरे गावचे हददीत ग्रामीण पतसंस्थेचे गल्लीमध्ये येथे एकूण 1,75,000/- एकूण व किंमतीचे सोन्याचे दागीने वरील चार अज्ञात इसम यांनी फिर्यादी रा. बोर्ली पंचतन, श्रीवर्धन यांना फसवण्याच्या उदेशाने एक इसम पोलीस असल्याची बतावणी करुन इतर तीन इसमांच्या मदतीने लबाडीच्या हेतुने संगणमताने फिर्यादी यांची फसवणुक करुन सोन्याचे दागीने घेवुन गेले आहेत.

याबाबत गोरेगांव पोलीस ठाणे गुरनं.23/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 318(4),204,319(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/पांडुरंग सानप हे करीत आहेत.

**5.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/04/2025 रोजी 05:05 वा ते दि. 20/04/2025 रोजी 05:05 वा च्या दरम्यान मौजे वासरंग लौजी स्टेशन रोडवर श्रीराम नगर बोर्डाजवळ रोडवर ता.खालापुर येथे अज्ञात कारवरील अज्ञात चालक याने त्याचे ताब्यातील कार ही अतिवेगाने, हयगयीने, अविचाराने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लेक्ष करून धोकादायक रित्या चालवुन रोडचे बाजुने चालत चाललेले फिर्यादी यांचे वडील दशरथ तातुराम कटके वय-67 वर्षे यांना ठोकर मारून अपघात करून अपघात जखमी वडील यांचे लहान मोठया गंभीर दुखापतीस कारणीभुत होवुन अपघात ठिकाणी न थांबता निघुन गेला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.107/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184,134, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 चे कलम 281,125(a),125 (b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/अमोल धायगुडे हे करीत आहेत.

**6.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/04/2025 रोजी 15:15 वा च्या सुमारास मौजे मोहाचीवाडी येथे पाण्याच्या टाकीजवळ ता.कर्जत येथे फिर्यादी रा. मोहाचीवाडी नेरळ ता.कर्जत हे त्यांचे घराचे पाठीमागे पाण्याच्या टाकीजवळ मोबाईलवर बोलत असताना आरोपीत हा तेथे

येवून फिर्यादी यांना बोलला की तू माझे मित्राच्या विरुध्द नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार का दिलीस? असे बोलून शिवीगाळी करुन त्याचे हातातील कोयत्याने फिर्यादीचे पाठीत डाव्या हातावर व उजव्या हाताचे दोन बोटांवर कोयत्याने वार करुन गंभीर दुखापत केली. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक वेळ 20/04/2025 रोजी 21:56 वा च्या सुमारास अटक करण्यात आली.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.63/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(2),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई गच्चे हे करीत आहेत.

**7.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक20/04/2025 रोजी 14:15 वा च्या सुमारास मौजे सागाव मारुतीमंदीर तळवली ता.अलिबाग येथे फिर्यादी व साक्षीदार रा.मुनवली,पो.मापगाव ता.अलिबाग हे यांचे ताब्यातील एस.टी बस ही अलिबाग कार्लेखिंड मार्गे रेवस असे जात असताना स्कुटी चालक आरोपीत नं 1 ते 4 यांनी बस सागाव मारुती मंदीराचे पुढे अडवुन तुम्ही गाडी कशी चालवता असे बोलुन फिर्यादी व साक्षीदार यांना बोलुन तसेच डयुटीवरुन घरी जात असलेले चालक तसेच गाडीतील प्रवासी यांना संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदार हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा केला तसेच शिवीगाळी करुन त्यांना हाताबुक्याने मारहाण केली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.71/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 132,126(2),115(2),352,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/सागर राउत हे करीत आहेत.

**8.** श्रीवर्धन पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/04/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे श्रीवर्धन बस स्टॅडच्या बाहेरील आवारात, श्रीवर्धन येथे आरोपी 01 ते 05 इतर 05 ते 07 इसम रा.मेटकर्णी श्रीवर्धन ता. श्रीवर्धन यांनी दिनांक 19/04/2025 रोजी झालेल्या भांडणचा राग मनात धरुन आपसात संगनमत करुन गैरकायद्याची मंडळी जमवुन हातात लाकडी दांडके व प्लास्टीक पाईप, तसेच चाबुक घेउन फिर्यादी व जखमी यांना लाकडी दांडक्याने, प्लास्टीक पाईप, चाबकाने व इतर आरोपीत याने हावाबुक्यांनी मारहाण करुन दुखापत केली आहे म्हणुन तसेच मा. जिल्हाधिकारी सो रायगड अलिबाग यांचेकडील जमावबंदी आदेशाचे उल्लधंन केले.

याबाबत श्रीवर्धन पोलीस ठाणे गुरनं.26/2025, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 चे कलम 37(1)c, भा.न्या.सं 2023 चे कलम 191(1), 191(2),190,118(1),115(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/लकडे हे करीत आहेत.

**9.** श्रीवर्धन पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/04/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे श्रीवर्धन बस स्टॅडच्या बाहेरील चायनिजच्या दुकानासमोर, श्रीवर्धन येथे दि.20/04/2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजण्याचे सुमारास दुपारी 03.45 वाजण्याचे सुमारास औदुंबर मठाचा गौंड येथे पाहिलेला प्रकार फिर्यादी हे साक्षीदार, यांना सांगत असताना आरोपी क्र 01 व 06 व इतर

07 ते 08 अनोळखी लोकांनी तेथे येवुन दि. 19/04/2024 रोजी श्रीवर्धन बिच येथे झालेल्या भांडणचा राग मनात धरुन आपसात संगनमत करुन आरोपी क्र 01 याने फिर्यादी यांची पुतणी हिला उजव्या हाताचे मनगटाजवळ चाकुने वार करुन दुखापत केली व आरोपी क्र 02 यांने साक्षीदार यांना मानेवर लाकडी दांडक्याने उपट मारली तसेच आरोपी क्र 03 ,ते 06, व इतर 07ते 08 अनोळखी इसम यांनी हाताबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली.

याबाबत श्रीवर्धन पोलीस ठाणे गुरनं. 27/2025, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 37(1)c, भा.न्या.सं 2023 चे कलम 191(1), 191(2),190,118(1),115(2),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरिक्षक श्री.सुधाकर लहाणे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 20.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 231 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,30,700/-रुपये इतका दंड आकारला आहे.